आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२४ जून २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- १८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन आजपासून सुरू, खासदारांचे शपथविधी सुरू
- गव्हाचे दर स्थिर राखण्यासाठी केंद्र सरकारकडून गव्हाच्या साठवणुकीवर मर्यादा
- पुण्यातल्या अंमली पदार्थ प्रकरणी आतापर्यंत ९ जणांवर गुन्हा दाखल, ८ जणांना अटक

**आणि**

- टी-२० क्रिकेट विश्वचषकाच्या सुपर ८ मध्ये आज भारताची ऑस्ट्रेलियाशी लढत

**<><><><><>**

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन आज सुरू झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात भर्तृहरी महताब यांना हंगामी सभापती म्हणून शपथ दिली. भर्तृहरी महताब यांनी संसदेच्या नवनिर्वाचित खासदारांना सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ दिली. त्यानंतर सर्व सदस्यांचा शपथविधी सुरू झाला. सभापतींनी सर्वप्रथम प्रधानमंत्री आणि वाराणसीचे खासदार नरेंद्र मोदी यांना शपथ दिली. सभापती निवडीपर्यंत लोकसभेचे कामकाज चालविण्यात मदत करण्यासाठी नियुक्त केलेल्या अध्यक्षांच्या तालिकेला शपथ देण्यात आली. भाजप खासदार राधामोहन सिंग आणि फग्गन सिंग कुलस्ते यांनी तालिका सदस्य म्हणून शपथ घेतली.

मात्र, काँग्रेसचे खासदार के सुरेश, द्रमुकचे खासदार टी. आर. बाळू आणि टीएमसीचे सुदीप बंदोपाध्याय यांनी शपथ घेतली नाही. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, शिवराज सिंह चौहान, नितीन गडकरी यांच्यासह इतर मंत्र्यांनी सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ घेतली.

पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ, जळगावच्या खासदार रक्षा खडसे, केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी मराठीतून शपथ घेतली. इतर अनेक खासदारांनी त्यांच्या मातृभाषेत आणि आणि इतर प्रादेशिक भाषांमध्ये शपथ घेतली. उर्वरित खासदारांचे शपथविधी उद्या होणार आहेत.

दरम्यान, भाजपा अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांची राज्यसभेच्या सभागृहनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

येत्या बुधवारी २६ जूनला नवीन लोकसभा सभापतींची निवड होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन येत्या गुरुवारी २७ जूनला सुरु होणार असून त्याच दिवशी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण होईल. अधिवेशन ३ जुलैपर्यंत चालेल.

**<><><><><>**

एकशे चाळीस कोटी भारतीयांचं जीवनमान सुधारणं हीच रालोआ सरकारच्या लेखी खरी सुधारणा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. समाजमाध्यमावर आज त्यांनी प्रकाशित केलेल्या मजकुरात लिहीलं आहे की, वस्तू आणि सेवा कर प्रणालीची अंमलबजावणी केल्यापासून अनेक गृहोपयोगी वस्तू स्वस्त झाल्या असून सामान्य माणसाच्या बचतीत भर पडली आहे. देशवासियांच्या जीवनमानात सुधारणा घडवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

गव्हाचे दर स्थिर राखण्याच्या दृष्टीनं साठेबाजी रोखण्याकरता केंद्र सरकारनं गव्हाच्या साठवणुकीवर मर्यादा घातल्या आहेत. केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण सचिव संजीव चोप्रा यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. त्यानुसार व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी ही मर्यादा ३ हजार टन,

किरकोळ विक्रेत्यांसाठी १० टन, तर मोठ्या साखळी समूहांच्या प्रत्येक दुकानाकरता १० टन आणि त्यांच्या आगारांकरता ३ हजार टन इतकी आहे.

सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या सर्व व्यापारी, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, साखळी समूह आणि प्रक्रियाकर्त्यांना ही मर्यादा लागू आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत ती लागू राहील, असं चोप्रा यांनी सांगितलं. गव्हाचे दर स्थिर रहावेत यासाठी सरकार गरजेनुसार या साठा मर्यादेचा आढावा घेईल, असं ते म्हणाले.

गव्हाचा तुटवडा असल्याचं वृत्त त्यांनी फेटाळलं. देशात कुठेही तुटवडा नसून गव्हाचे दर स्थिर आहेत. ते स्थिर रहावेत यासाठी सरकारपुढं सर्व पर्याय खुले आहेत. साठवणुकीवरची मर्यादा हा एक उपाय आहे, तो केला आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज भंडारा जिल्ह्यात ५४७ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं भूमीपूजन केलं. भंडारा जिल्ह्यात वैनगंगा नदीच्या काठावर १०२ कोटी रुपये खर्च करून नव्यानं सुरू केलेल्या जलपर्यटन प्रकल्पाचं उद्घाटन त्यांनी केलं. यावेळी भंडाऱ्याचे अपक्ष आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

**<><><><><>**

राज्याच्या आदिवासी विकास विभागातल्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागानं गेल्या २३ नोव्हेंबर रोजी ६०२ रिक्त पदांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास संवर्गांचा जाहिरातीत समावेश नसल्यानं ही जाहिरात

रद्द केली आहे. यादी अद्ययावत झाल्यानंतर पुढच्या कार्यवाहीविषयी माहिती दिली जाईल असं अधिकृत सूत्रांनी कळवलं आहे.

<><><><><>

नीट पेपरफुटीप्रकरणी लातूरमधून चार जणांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यातल्या जलील पठाण याला पोलिसांनी काल अटक केली होती. त्याला आज न्यायालयानं २ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

<><><><><>

पुण्यातल्या अंमली पदार्थ प्रकरणात आतापर्यंत ९ जणांवर गुन्हा दाखल झाला असून ८ जणांना अटक करण्यात आली आहे. अंमली पदार्थांचं सेवन करणाऱ्या मुलांचा पुणे पोलिस शोध घेत आहे. याप्रकरणी हलगर्जीपणा आणि लक्ष ठेवण्यात दिरंगाई केली म्हणून दोन अधिकारी आणि दोन अमलदारांचं निलंबन केल्याची माहिती पोलिस उपायुक्त संदीप गिल यांनी दिली आहे. सीसीटीव्ही चित्रण पाहून तपासणी केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

NEET परीक्षेतील कथित गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयचं एक पथक गुजरातमधल्या गोध्रा इथं दाखल झालं आहे. गोध्रा इथल्या एका परीक्षा केंद्रावर ५ मे रोजी NEET चा पेपर झाल्यानंतर तीन दिवसांनी तिथल्या पोलीस स्टेशनमध्ये परीक्षेतल्या गैरप्रकाराबद्दल एफआयआर नोंदवण्यात आला होता. गोध्रा पोलिसांनी या प्रकरणात ३० विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी मदत केल्याच्या आरोपाखाली आतापर्यंत पाच आरोपींना अटक केली आहे.

दरम्यान, गुजरातमधल्या पंचमहाल जिल्हा न्यायालयाच्या सत्र न्यायाधीशांनी शुक्रवारी आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला.

**<><><><><>**

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८ मध्ये आज भारताचा सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. बार्बाडोसमधल्या सेंट लूसिया इथल्या डॅरेन सॅमी मैदानावर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल.

आज सकाळी दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांच्यातल्या सामन्यात व्यत्यय आल्यानंतर डकवर्थ लुइस पद्धतीनं निर्णय झाला. दक्षिण आफ्रिकेनं सामना जिंकल्याचं घोषित करण्यात आलं. तत्पूर्वी काल रात्रीच्या सामन्यात गतविजेत्या इंग्लंडनं अमेरिकेचा १० गडी राखून पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

**<><><><><>**

राज्य सरकारनं शेतकऱ्यांचं कर्ज सरसकट माफ करावं, आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधाचे दर वाढवून द्यावेत, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. तेलंगणात काँग्रेस सरकारनं शेतकऱ्यांचं सरसकट २ लाख रुपयांचं कर्ज माफ केलं आहे. त्याप्रमाणे येत्या २७ तारखेला सुरु होणाऱ्या विधिमंडळ अधिवेशनात राज्य सरकारनं शेतकऱ्यांच्या कर्ज माफीची घोषणा करावी, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

नवी मुंबईतल्या कृषी उत्पन्न बाजार समितीमधल्या माथाडी कामगारांनी आज नवी मुंबई महापालिकेवर मोर्चा काढला होता. कांदा-बटाटा मार्केटच्या इमारतीचा पाणीपुरवठा खंडीत केल्याच्या विरोधात हा मोर्चा होता. बाजार समिती मधल्या अतिधोकादायक इमारतींचा पाणीपुरवठा नवी मुंबई महानगरपालिकेनं

खंडीत केला आहे. अतिधोकादायक गाळ्यांमध्ये दुर्घटना झाली तर जबाबदारी घेऊ, असं हमीपत्र लिहून पालिकेला द्यावं अशी सूचना महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी आंदोलकांना केली. हे हमीपत्र मिळाल्यानंतर मार्केटमधील पाणी पुरवठा सुरू केला जाईल, असं आश्वासन आयुक्तांनी दिलं.

**<><><><><>**

ऑनलाइन फसवणुकीच्या एका प्रकरणात रत्नागिरी पोलिसांनी आरोपीला चंदिगढ मधून अटक केली. व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये आणि वैयक्तिक संदेश पाठवून, गुंतवणुकीवर जास्त रकमेचा परतावा देण्याचं आमिष दाखवून रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेडमधल्या एका व्यक्तीची तब्बल २४ लाख ८५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. आरोपीला न्यायालयानं २५ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

**<><><><><>**

नाशिक-गुजरात सीमेवर लाकडांची तस्करी करणाऱ्या तस्कराला नाशिकच्या वन विभागाच्या पथकानं अटक केली आहे. गेल्या तीन दिवसांपासून नाशिक जिल्ह्यातल्या पेठ, सुरगाणा, हरसुल, त्र्यंबकेश्वर या भागातल्या जंगलात खैर, साग या झाडांची तस्करी होत असल्याची माहिती वन विभागाला मिळाली होती. मिळालेल्या माहितीवरून सापळा रचत वन विभागानं नवसूभाई लोहार या तस्कराला अटक केली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. विदर्भ आणि

मध्यमहाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तिथे तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होऊ शकतो.